दैनिक
अदिती एक्सप्रेस

दि. ७ जानेवारी २०२६
बुधवार
वर्ष ४ थे
अंक ७१
किंमत २ रूपये
पृष्ठे ४
लातूर
RNINO.MHMAR/25/A1409

संपादक - गंगाधर अभंग डिगोळे उपसंपादक : डॉ. ज्ञानेश्वर विठ्ठल कल्याणे ईमेल-aditiexpress33@gmail.com, Website: www.aditiexpress.in

आजचे पंचाग
- दिनांक : ७ जानेवारी २०२६
- वार : बुधवार
- माह (अमावस्यांत) : पौष
- माह (पूर्णिमांत) : माघ
- ऋतु : शिशिर
- आयन : उत्तरायण
- पक्ष : कृष्ण पक्ष
- तिथी : पंचमी तिथी (८ जानेवारी सकाळी ०६:३३ पर्यंत) त्यानंतर षष्ठी तिथी
- नक्षत्र : मघा नक्षत्र (सकाळी ११:५६ पर्यंत) त्यानंतर पूर्वा फाल्गुनी नक्षत्र
- योग : आयुष्मान योग (सायंकाळी ०६:३३ पर्यंत) त्यानंतर सौभाग्य योग
- करण : कौलव करण (सायंकाळी ०६:३६ पर्यंत) त्यानंतर तैतुला करण
- चंद्र राशी : कर्क राशी (दुपारी १२:१७ पर्यंत) त्यानंतर सिंह राशी
- सूर्य राशी : धनु राशी
- अशुभ मुहूर्त:
- राहु काळ : दुपारी १२:४५ ते दुपारी ०२:०७ पर्यंत
- सूर्योदय : सकाळी ०७:१५
- सूर्यास्त : सायंकाळी ०६:१५
- संवत्सर : विश्वावसु
- संवत्सर(उत्तर) : सिद्धार्थी
- विक्रम संवत: २०८२ विक्रम संवत
- शक संवत: १९४७ शक संवत

देवेंद्र फडणवीसांचा उद्धव ठाकरेंना सणसणीत टोला

धुळे : राज्यात होत असलेल्या २९ महापालिकांच्या निवडणुकांमध्ये जवळपास ६८ उमेदवार बिनविरोध आल्याच्या मुद्द्यावरून राजकीय रणकंदन सुरू आहे. ज्या प्रभागांमध्ये उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत, अशा ठिकाणच्या निवडणुका रद्द करून त्या प्रभागांमध्ये नव्याने निवडणूक प्रक्रिया राबवावी, अशी मागणी उबाठाप्रमुखांनी केली. तसेच निवडणूक आयोग भाजपाच्या सांगण्यानुसार काम करत असल्याचे आरोपही उद्धवसेनेकडून सातत्याने करण्यात येत आहेत. याच मुद्द्यावरून मंगळवारी देवेंद्र फडणवीस यांनी धुळ्यात बोलताना उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला.



'या वेळेला आपण सर्वांनी कमाल केली आहे. सर्वत्र निवडणुकांचे वातावरण आहे. कार्यकर्ते कामाला लागले आहेत. पण धुळ्यात सुरुवातीलाच चार नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत. तुम्ही बिनविरोधचा चौकार लगावला आहे. धुळ्यामध्ये भाजपने चार नगरसेवक निवडून आणले आहेत. पण आपले नगरसेवक बिनविरोध निवडून आले, त्यामुळे काही लोकांना मात्र मिर्ची झोंबली आहे. अब तुमको मिर्ची लगी तो मै क्या करु', अशा शब्दांत देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंना सणसणीत टोला लगावला.

देशाच्या लोकसभेमध्ये तब्बल ३५ खासदार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यापैकी ३३ खासदार हे काँग्रेसच्या काळात निवडून आले आहेत. खासदार जेव्हा बिनविरोध निवडून येतात तेव्हा लोकशाही जिवंत असते आणि धुळेकरांनी आमचे चार नगरसेवक बिनविरोध दिले, तर लोकशाहीचा खून झाला. असे म्हणणाऱ्यांचे डोके नेमके कुठे आहे हे सांगण्याची आवश्यकता नाही. आमची जनता आमच्यावर प्रेम करते. **(पान २ वर)**

सोनिया गांधी रुग्णालयात



नवी दिल्ली : काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या खासदार सोनिया गांधी यांना दिल्लीतील सर गंगाराम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मंगळवारी सकाळी त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना रुग्णालयात नेण्यात आले. डॉक्टरांचे एक पथक त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवून आहे. राज्यसभा खासदार असलेल्या सोनिया गांधी गेल्या काही वर्षांपासून आरोग्याच्या समस्यांशी झुंजत आहेत. म्हणूनच त्या नियमित तपासणी आणि उपचारांसाठी वेळोवेळी रुग्णालयात दाखल होत असतात. सोनिया गांधी यांना जून २०२५ मध्येही प्रकृती अस्वस्थ झाल्याने याच रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. **(पान २ वर)**

काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर न्यायालयाची दखल; बजरंग दल प्रकरणी पोलिस तपास सुरू

मुंबई : काँग्रेसने २०२३ च्या कर्नाटक विधानसभा निवडणुकीवेळी जाहीरनाम्यात बजरंग दलवर बंदी घालण्याचं आश्वासन दिलं होतं. या जाहीरनाम्याच्या माध्यमातून हिंदुत्ववादी संघटनेची बदनामी केल्याचा आरोप करत बजरंग दलाकडून न्यायालयात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

या तक्रारीची दखल घेत सोमवारी ५ जानेवारी रोजी दंडाधिकारी न्यायालयाने भांडुप पोलिसांना या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, या चौकशीचा सविस्तर अहवाल १७ फेब्रुवारीपर्यंत न्यायालयात सादर करण्याचे निर्देश पोलिसांना देण्यात आले आहेत.

नेमकं प्रकरण काय आहे?

कर्नाटक विधानसभा निवडणुकीदरम्यान काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात बजरंग दलची तुलना 'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' या प्रतिबंधित संघटनेशी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या तुलनेमुळे संघटनेची प्रतिमा मलिन झाली असल्याचं बजरंग दलाचं म्हणणं आहे. या प्रकरणी मुंबईतील एका बजरंग दलाच्या कार्यकर्त्याने वकील संतोष दुबे यांच्यामार्फत दंडाधिकारी न्यायालयात तक्रार दाखल केली आहे.

या तक्रारीवर सोमवारी माझगाव येथील न्यायालयात मुख्य न्यायदंडाधिकारी ए. ए. कुलकर्णी यांच्यासमोर सुनावणी झाली. तक्रारीत काँग्रेस पक्षासह राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यावर भारतीय दंड संहिता कलम ४९९ आणि ५०० अंतर्गत मानहानीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तक्रारदाराचा आरोप काय?

तक्रारदाराच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, बेकायदेशीर क्रियाकलाप प्रतिबंध कायद्यानुसार कोणत्याही संघटनेवर बंदी घालण्याचा अधिकार केवळ केंद्र सरकारलाच आहे. त्यामुळे काँग्रेसने जाहीरनाम्यात बजरंग दलवर बंदी घालण्याचं दिलेलं आश्वासन दिशाभूल करणारे आणि बदनामीकारक असल्याचा आरोप करण्यात आला आहे. **(पान २ वर)**

लाल किल्ल्याजवळील स्फोटप्रकरणात एनआयएचा तपास वेगात; नऊ आरोपी अटकेत

नवी दिल्ली : लाल किल्ला स्फोट प्रकरणातील आरोपी यासिर अहमद दार याची कोठडी १६ जानेवारीपर्यंत वाढवण्यात आली आहे. दिल्लीतील पटियाला हाऊस न्यायालयाने हा आदेश दिला असून यापूर्वी २६ डिसेंबर रोजी न्यायालयाने यासिर अहमद दार याला एनआयए कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले होते. या प्रकरणात आतापर्यंत एकूण नऊ आरोपींना अटक करण्यात आली होती. सध्या सर्व आरोपी न्यायालयीन आणि तपास यंत्रणांच्या कोठडीत आहेत. या



स्फोटप्रकरणाचा तपास राष्ट्रीय तपास संस्थेकडून सुरू आहे.

आत्मघाती बॉम्बर बनवण्यासाठी ब्रेनवॉश केल्याचा आरोप

या प्रकरणाशी संबंधित आणखी एक आरोपी जसीर बिलाल वाणी उर्फ दानिश याला १८ नोव्हेंबर रोजी पटियाला हाऊस न्यायालयाने एनआयए कोठडी सुनावली होती. एनआयएने दानिशला श्रीनगरमधून अटक केली होती. तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, स्फोटापूर्वी दानिशने ड्रोनमध्ये तांत्रिक बदल केल्याचा आणि रॉकेट असेंबल करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे.

एनआयएच्या म्हणण्यानुसार, दानिशने कथित आत्मघाती बॉम्बर उमर नबीसह संपूर्ण कट रचण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. राज्यशास्त्रात पदवीधर असलेल्या **(पान २ वर)**

अमेरिकेत हैदराबादच्या लेकीचा निर्घृण खून

हैदराबाद : अमेरिकेतील मेरीलँड राज्यात डेटा आणि स्ट्रॅटेजी नालिस्ट म्हणून कार्यरत असलेल्या निकिता गोडिशला (वय २७) या तरुणीची अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आली आहे. निकिताचा मृतदेह ३ जानेवारी रोजी कोलंबिया येथील एका अपार्टमेंटमध्ये रक्ताच्या थारोळ्यात सापडला. याप्रकरणी तिचा माजी रूममेट अर्जुन शर्मा (वय २६) हा मुख्य संशयित असून, निकिताची हत्या केल्यानंतर तो गुपचूप भारतात पळून आला होता. मात्र, इंटरपोलच्या मदतीने तमिळनाडू पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या आहेत.



नेमकं प्रकरण काय?

मिळालेल्या माहितीनुसार, निकिता आणि अर्जुन हे अमेरिकेत एकाच फ्लॅटमध्ये रूममेट म्हणून राहत होते. अर्जुनने निकिताकडून सुमारे ४,५०० डॉलर्स (जवळपास ४ लाख रुपये) उसने घेतले होते. निकिताने वारंवार पैसे परत मागितल्याने अर्जुनने तिला ३१ डिसेंबर रोजी पैसे नेण्यासाठी आपल्या घरी बोलावले. तिथे दोघांमध्ये वाद झाला आणि रागाच्या भरात अर्जुनने निकितावर चाकूने अनेक वार केले. या हल्ल्यात निकिताचा जागीच मृत्यू झाला.

आरोपीची चलाखी आणि पलायन

निकिताची हत्या केल्यानंतर अर्जुनने स्वतःच २ जानेवारी रोजी पोलीस ठाण्यात जाऊन निकिता बेपत्ता असल्याची तक्रार नोंदवली. पोलिसांना संशय येऊ नये म्हणून त्याने हे नाटक केले आणि त्यानंतर लगेच वॉशिंग्टन विमानतळावरून भारताकडे जाणारे विमान पकडले. ३ जानेवारीला पोलिसांनी अर्जुनच्या घराची झडती घेतली असता, तिथे निकिताचा मृतदेह आढळून आला.

'तो बॉयफ्रेंड नव्हता' - वडिलांचे स्पष्टीकरण

या घटनेनंतर काही माध्यमांमध्ये अर्जुन हा निकिताचा माजी प्रियकर असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. मात्र, निकिताचे वडील आनंद गोडिशला यांनी हे वृत्त फेटाळून लावले आहे. अर्जुन हा निकिताचा प्रियकर नव्हता, तर तो केवळ तिचा माजी रूममेट होता. पैशांच्या वादातून त्याने माझ्या मुलीचा जीव घेतला. माध्यमांनी चुकीच्या अफवा पसरवू नयेत, **(पान २ वर)**

किल्लारीच्या निळकंठेश्वर साखर कारखान्याची भरारी; ४४ दिवसांत १ लाख मेट्रिक टन ऊस गाळप पूर्ण

दै. अदिती एक्सप्रेस

औसा : आमदार अभिमन्यू पवार यांच्या पुढाकारातून व सातत्यपूर्ण प्रयत्नातून सुरू झालेल्या किल्लारी येथील श्री निळकंठेश्वर सहकारी साखर कारखान्याने अवघ्या ४४ दिवसांत १ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. अनेक आर्थिक, तांत्रिक व प्रशासकीय अडचणींवर मात करत कारखान्याने साधलेली ही कामगिरी सहकार क्षेत्रासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

एकेकाळी मृतावस्थेत गेलेला व अनेक वर्षे बंद असलेला



हा कारखाना सहकाराच्या माध्यमातून पुन्हा नव्या जोमाने कार्यान्वित झाला आहे. 'श्री निळकंठेश्वराचे आशीर्वाद आणि शेतकऱ्यांचा विश्वास' या बळावर कारखान्याने १ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला असून सध्या कारखाना पूर्ण क्षमतेने सुरू आहे. या यशाबद्दल कारखान्यावर अहोरात्र कार्यरत असलेले सर्व अधिकारी, कर्मचारी, **(पान २ वर)**

पत्रकार समाजाचा आरसा: सहकार मंत्री नामदार पाटील

दै. अदिती एक्सप्रेस

चाकुर / प्रतिनिधी- पत्रकार हा समाजाचा आरसा असून पत्रकाराच्या माध्यमातून समाजाचे प्रतिबिंब उमटते असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी चाकूर येथे केले.

चाकूर तालुका पत्रकार संघ व्हॉइस ऑफ मीडिया यांच्या वतीने दर्पण दिनानिमित्त आरोग्य शिबिर व हेल्मेट वाटप कार्यक्रमाचे आयोजन चाकूर येथील कृषी महाविद्यालयात करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते.

व्यासपीठावर माहिती संचालक डॉ. शाम टरके, राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे, गटविकास अधिकारी संतोष वांगवडे , प्राचार्य डॉ. संतोष



कांबळे ,विशाल जाधव, सरपंच डॉ . भालचंद चाटे, नरसिंह घोणे, धनंजय कोरे, डॉ

डॉ. विवेक होळे पाटील, निलेश मद्रेवार, पपन कांबळे ,अनिल वाडकर,वर्धमान कांबळे , विष्णू तीकटे, संदीप शेटे, बिलाल पठाण , श्रीनाथ सावंत, ओम केंद्रे, नाथा मद्रेवार, विश्वनाथ पाटील, अर्जुन भोईटे, सह विविध मान्यवर उपस्थित होते.

यापुढे बोलताना सहकार मंत्री नामदार पाटील म्हणाले की, पत्रकारिता ही समाजाला न्याय देण्यासाठी असते व **(पान २ वर)**

राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व वंचीत बहूजन आघाडी उमेदवारांच्या प्रचारार्थ लातुरच्या पंचशील चौक भागात जाहीर सभा संपन्न

दै. अदिती एक्सप्रेस

लातुर प्रतिनिधी:- लातुर शहर महानगरपालिका निवडणूकीच्या अनुषंगाने भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व वंचित बहुजन आघाडी उमेदवारांच्या प्रचाराला सुरुवात झाली असून त्यांच्या प्रचारार्थ दि. ०५ जानेवारी (सोमवार) रोजी सायंकाळी लातुर शहरातील पंचशील चौक या ठिकाणी जाहीर प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते.

या जाहीर प्रचार सभेसाठी आमदार,महाराष्ट्र विधानसभा,माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांच्यासह खा. डॉ. शिवाजी काळगे यांची प्रमुख



उपस्थिती होती.

लातुर महानगरपालिका निवडणुक निमित्ताने भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या प्रभाग १० मधील उमेदवार-अजनीकर कांचन,मुस्कावाड सुकेशनी, सुळ दिपक,सोळुंके बालाजी तसेच प्रभाग११ मधील वाघमारे विकास(भारतीय राष्ट्रीय काँग्रेस),बंडगर छाया,अजनीकर सुजाता(वंचित बहुजन आघाडी),आणि सोलंकर पवन भानुदास (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस) या १० व प्रभाग ११ मधील उमेदवारांच्या प्रचारार्थ सदरील जाहीर प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की,लातुर महानगर पालिका निवडणूक होत असून यासाठी १५ जानेवारी ला मतदान होणार आहे आणि या लातूरची सूत्र कोनाच्या हाती द्यायची हे आपल्याला ठरवायचे आहे. **(पान २ वर)**

मुलभूत सुविधा सक्षम करण्यावर भर : अजित पाटील कव्हेकर

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर/प्रतिनिधी : भाजपाच्या नेतृत्वात शहरात विकास कामांना गती मिळाली आहे. शहरातील रस्ते, पाणीपुरवठा भूमिगत गटार योजना, आरोग्य, शिक्षण यासह मुलभूत सुविधा सक्षम करण्यावर भाजपाने भर दिला असून ही कामे पुढे घेवून जाण्यासाठी भाजपाला पुन्हा एकदा संधी द्या असे आवाहन भाजपा लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले.

भाजपाचे प्रभाग १८ मधील उमेदवार ऋषिकेश राजे, सौ. सत्यवती चेवले, सौ. अदिती पाटील कव्हेकर व प्रभाग क्रमांक ५ मधील उमेदवार योगेश शिरसाट, सुवर्णा येलाले, आएशा शेख, शिवकुमार बिराजदार यांच्या प्रचारार्थ अजित पाटील यांनी ठिकठिकाणी पदयात्रा काढून नागरिकांशी संवाद साधला.

यावेळी बोलताना अजित पाटील कव्हेकर म्हणाले की, भाजपाच्या माध्यमातून लातूर शहरात २५ हजार घरांना



पिण्याचे शुध्द पाणी देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. १३५०० नागरिकांना हक्काचे घर तसेच ७०हजार लाडक्या बहिणींना आधार देण्यात आला आहे. विकास, विश्वास आणि जनकल्याण साधण्यासाठी भाजपा हा एकमेव पर्याय आहे. भाजपाच्या माध्यमातूनच प्रभागात रस्ते, पाणी पुरवठा योजना, स्वच्छता व आरोग्य या सुविधा लाभल्या आहेत. जनकल्याणाचे हे कार्य अधिक गतीने पुढे नेण्यासाठी भाजपाच्या उमेदवारांना विजयी करा, असे आवाहनही त्यांनी केले. या बैठकांना भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच प्रभागातील नागरिक आणि मतदारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

व्हेनेझुएलातील उठाव

व्हेनेझुएला हे दक्षिण अमेरिकेतील राष्ट्र पुन्हा एकदा जागतिक केंद्रस्थानी आले. यावेळी त्याची कारणे आहेत ती आर्थिक अस्थिरता, सामाजिक असंतोष आणि देशांतर्गत तीव्र झालेला गंभीर पेचप्रसंग. व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष आणि त्यांच्या पत्नी सिल्विया यांना अमेरिकेने जेरबंद केले आणि आता त्या देशाचे भवितव्य अमेरिकेच्या हाती आहे. त्याचे तेलसाठेही अमेरिकेच्या कब्जात आहेत.

व्हेनेझुएलाच्या संदर्भात असे म्हणता येईल की, तेथे राजकीय संकट आणि लोकशाहीच्या नावाखाली बाह्य शक्तीनी केवळ खुला हस्तक्षेप केला. सत्तापरिवर्तनाला प्रोत्साहन देण्याचे धोरणही अवलंबिले. व्हेनेझुएलावरील अमेरिकेचा हल्ला म्हणजे अमेरिकेची दादागिरी. तेथे अमेरिकेने कमांडो पाठवले आणि मादुरो यांना बेड्या घालून अमेरिकेत आणले. असेच धोरण अमेरिकेने सद्दाम हुसेन यांच्याबाबतीतही राबवले होते आणि त्यांना अमेरिकेने वेगळ्या प्रकारे जगाला त्यांच्यापासून धोका आहे असे दाखवून ठार मारले. जे सद्दाम हुसेन यांच्याबाबतीत अमेरिकेने केले तेच आता निकोलस मादुरो यांच्याबाबतीत करत आहे. अर्थात निकोलस मादुरो यांच्या बाबतीत अमेरिका त्यांच्यावर सरळ दहशतवादी ठरवू शकत नाही, तर व्हेनेझुएलाकडे असलेले अनिर्बंध तेल साठे हस्तगत करून तिथे आपले नियंत्रण मिळवायचे धोरण आखून अमेरिकेने व्हेनेझुएलावर ही कारवाई केली. व्हेनेझुएला हा देश एकेकाळी लॅटिन अमेरिकेतील सर्वात श्रीमंत देश होता. तिथे तेल साठे प्रचंड होते. मात्र सध्या हा देश अन्नाचा तुटवडा, अतिमहागाई आणि औषधांचा तुटवडा यांसारख्या संकटाशी झुंजतो आहे. इथे हिंसाचार पराकोटीला पोहोचला आहे. सरकारी आणि विरोधी पक्षांमध्ये तणाव ताणला आहे. या परिस्थितीचा फायदा अमेरिकेने उचलून निकोलस मादुरा यांना उचलले आणि आपल्याकडे आणले. तेलसाठ्यांवर आता अमेरिकेचे नियंत्रण आहे. याचा अर्थ देश आता अमेरिकेच्या ताब्यात गेला. भारताने व्हेनेझुएलातील स्थिती संवाद आणि घटनात्मक माध्यमातून सोडवता येईल असे सांगितले. पण अमेरिका त्याकडे लक्ष देण्यास तयार नाही.

व्हेनेझुएलातील स्थितीचा फायदा उचण्यासाठी अमेरिकेने त्या देशाच्या राष्ट्राध्यक्षांना पत्नीसह उचलून आपल्याकडे आणणे आणि डांबून ठेवणे यामुळे खरा पेच निर्माण झाला आहे. अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले आहे, की अमेरिकन तेल कंपन्या आता व्हेनेझुएलातील समृद्ध तेलसाठ्याचा ताबा घेतील. एकदा तेलावरील निर्बंध संपले, की अमेरिकेला व्हेनेझुएलातील तेलाचा अनिर्बंध उपभोग घेता येईल. भारत आणि व्हेनेझुएला यांचे संबंध तेलाच्या दृष्टीने महत्त्वाचे आणि दीर्घ काळापासून आहेत. कारण व्हेनेझुएला हा आपला तेलाचा भरवशाचा पुरवठादार होता. पण अमेरिकेने व्हेनेझुएलावर हल्ले करण्याला पार्श्वभूमी युक्रेन युद्धाची आहे. रशिया आणि युक्रेन यांच्यात युद्ध सुरू झाले, त्यानंतर ९ दिवसांनी अमेरिकन फौजांनी काराकसवर हल्ले केले आणि मादुरो आणि त्यांच्या पत्नींना बंदी करून अमेरिकेत आणले. सद्दामच्या वेळेला अमेरिकेने असा दावा केला होता की सद्दामला मारून आम्ही जगाला संकटातून मुक्त केले आहे. फरक इतकाच होता की पूर्वी अमेरिका संपूर्ण जगात आपल्या दादागिरीने सरकारे उलथवून पाडायची आणि त्यासाठी त्यांना संयुक्त राष्ट्रसंघाची परवानगी लागायची. आता तशी काहीच परिस्थिती नाही. संयुक्त राष्ट्रसंघ ही थिजलेली संस्था झाली आहे आणि अमेरिका कोणत्याही देशावर कारवाई करण्यासाठी राष्ट्रसंघाची परवानगी काही घेत बसत नाही. ट्रम्प सत्तेवर आल्यापासून जागतिक संबंधांच्या परिणामाना वेगळेच वळण आले. वास्तविक जग आज अशा अवस्थेत आहे की लहानशा देशातील लहान घटनाही ताकदवान राष्ट्राला हादरवून टाकू शकते. व्हेनेझुएलातील अमेरिकेचे आक्रमण त्याच प्रकारातील आहे. आता राष्ट्राध्यक्ष मादुरो आणि त्यांच्या पत्नी सिल्विया कुठे आहेत हेच आम्हाला माहिती नाही असे व्हेनेझुएलाच्या तेलमंत्र्यानी म्हटले आहे. त्यांनी ट्रम्प यांच्याकडे दोघेही पती-पत्नी जिवंत असल्याचे पुरावे मागितले आहेत. मात्र ट्रम्प यांची नजर व्हेनेझुएलातील तेल साठ्यांवर आहे हे लपून राहिलेले नाही.

लॅटिन अमेरिकेतील सर्वात श्रीमंत मानला जाणारा व्हेनेझुएला हा देश होता. पण त्याची ही श्रीमंती त्यांच्यासाठी अभिशाप आहे. अर्थात या देशाचे गैरव्यवस्थापन, राजकीय संघर्ष आणि सामाजिक अशांती यांच्याशी झुंज देत आहे. व्हेनेझुएलावर अमेरिकेने आर्थिक निर्बंध लादल्यामुळे त्याला आपल्याकडील तेलाचा पुरेपूर उपयोग करून घेता येत नाही. एक गोष्ट मात्र मान्य केली पाहिजे. व्हेनेझुएलाच्या पतनामागे केवळ अमेरिकाच नव्हे तर अर्थव्यवस्थेची विफलता त्याला कारण ठरली आहे. ह्यूगो चावेझ अध्यक्ष असताना लोकांना सरकारी तिजोरीतून वाट्टेल ती खैरात दिली जायची. त्यामुळे देश कंगाल झाला. मादुरो यांनी स्थिती सुधारली आणि हीच स्थिती अमेरिकेला नकोशी वाटली आणि त्यामुळे व्हेनेझुएलाचे पतन झाले. व्हेनेझुएलाचे पेट्रोल क्षेत्राला अमेरिकेकडून निर्बंध लादण्यात आले आहेत आणि त्यात अमेरिकेची भूमिका महत्त्वाची ठरली आहे. नेवल ब्लॉकेड या नावाखाली अमेरिकेच्या ट्रम्प प्रशासनाच्या दुसऱ्या निर्बंधामुळे व्हेनेझुएलाची तेल निर्यात खूपच कमी झाली आहे. पूर्वी तो तेल निर्यातीवर चालत होता. १९९०च्या दशकात व्हेनेझुएलाचा तेल निर्यातीतील वाटा ४ टक्के होता. आज तो खूपच कमी आहे. व्हेनेझुएला इतिहासातील सर्वात आव्हानात्मक स्थितीचा सामना करत आहे आणि अशा परिस्थितीत शांततेची हाक अत्यंत महत्त्वाची आहे. व्हेनेझुएलातील नेते जागतिक आवाज ऐकतील आणि स्थिती आणखी प्रक्षोभक होणार नाही याकडे लक्ष देतील अशी आशा आहे. भारताने व्हेनेझुएलातील शांतता आणि स्थैर्याची हाक दिली आहे आणि भारताचा आवाज शातता, स्थैर्य आणि लोकशाही प्रक्रिया यासाठी महत्त्वाचा मानला जावा. ट्रम्प यांच्या नापाक इराद्यांना व्हेनेझुएलाने तसेच प्रत्युत्तर द्यावे अशीच सामान्य व्हेनेझुएलातील लोकांची इच्छा आहे. अर्थात याबरोबर भारत सरकारची भारतीयांप्रती भूमिका महत्त्वाची आहे आणि त्यांची सुरक्षितता यांना सरकारने प्राधान्य द्यायला हवे. भारताने व्हेनेझुएलात मानवतावादी मदत पोहोचवण्यास

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आज लातूरात विजय संकल्प सभा

महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने टाऊन हॉल येथे धडाडणार तोफ

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर/प्रतिनिधी : लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपा उमेदवारांच्या प्रचारासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे बुधवार दि. ७ जानेवारी रोजी लातूर येथे येत आहेत. सकाळी ११ वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथील मैदानावर मुख्यमंत्र्यांची तोफ धडाडणार असून उपस्थित राहण्याचे आवाहन निवडणूक प्रमुख आ. संभाजी पाटील निलंगेकर, डॉ. सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर व शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले आहे.



मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत होणाजया या विजय संकल्प सभेस जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले, माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष बस्वराज पाटील मुरुमकर, आ. रमेश कराड, कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, आ. अभिमन्यू पवार, माजी खा. सुनिल गायकवाड यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. लातूर शहर महानगरपालिका निवडणूक भाजपा पूर्ण ताकदीने लढत आहे. सर्व ७० जागांवर भाजपाने उमेदवार उभे केले आहेत. विकासाच्या मुद्यावर उमेदवार मतदारांना सामोरे जात आहेत. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजना लातूरमधील नागरिकांना लाभदायक ठरलेल्या आहेत. या अनुषंगाने लातूरमध्ये भाजपाला पोषक वातावरण निर्माण झालेले आहे. या निवडणुकीत राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण हे प्रचाराच्या निमित्ताने येवून गेले आहेत. आता स्वत: मुख्यमंत्री सभा घेणार आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कच्या मैदानात होणाजया या सभेत लातूरच्या विकासाचा रोडमॅप मुख्यमंत्री सादर करणार आहेत. राज्य सरकारने आजपर्यंत लातूरसाठी राबविलेल्या योजना आणि भविष्यात विकासासंदर्भातील नियोजन त्यांच्याच मुखातून ऐकण्याची संधी यानिमित्ताने लातूरकरांना लाभणार आहे. लातूर मनपा क्षेत्रातील भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते, नागरिक आणि मतदारांनी यासभेस मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन निवडणूकप्रमुख आ. संभाजी पाटील निलंगेकर, डॉ. सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर व शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले आहे.



भाजपाकडे लातूरच्या विकासाचा स्पष्ट दृष्टीकोन : डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर/प्रतिनिधी : भाजपाकडे विश्वासार्ह नेतृत्व आहे. लातूर शहराच्या विकासाचा स्पष्ट दृष्टीकोन असून विकासाचा रोडमॅप तयार आहे, असे प्रतिपादन भाजपा नेत्या डॉ. सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी केले. भाजपाची प्रभाग क्रमांक १६ मधील उमेदवार गिरीष पाटील, शितलताई मालू, राजश्रीताई बाहेती, विनय जाकते, प्रभाग क्रमांक ६ गणेश गवारे, ज्योती आवसकर, मिना गायकवाड व गौरव काथवटे तर प्रभाग क्रमांक ८ मधील उमेदवार शैलेश गोजमगुंडे, विद्या सागावे, वंदना भराडिया आणि शैलेश स्वामी तर प्रभाग २ मधील उमेदवार अमर पटेल, रवि सुडे, निर्मला कांबळे, पुष्पा भडीकर यांच्या प्रचारार्थ आयोजित बैठकीत डॉ. सौ. अर्चना पाटील चाकूरकर बोलत होत्या. यावेळी निवडणुक प्रमुख आ. संभाजी पाटील निलंगेकर, कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांची उपस्थिती होती.

उपस्थितांशी संवाद साधताना डॉ. सौ. अर्चनाताई म्हणाल्या की, भाजपाने विकास काय असतो हे जनतेला दाखवून दिले आहे. मागील ११ वर्षात आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात झालेली विकासकामे पाहात आहोत. राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे गतीने विकासकामे करत आहेत. विकासाची हीच गती लातूरमध्ये कायम ठेवण्यासाठी महापालिकेत भाजपाची सत्ता येणे आवश्यक आहे. त्यामुळे मतदारांनी भाजपाच्या पाठिशी उभे रहावे, असे आवाहन डॉ. सौ. अर्चनाताई पाटील यांनी केले. या बैठकांना सुरेश पंडीत, व्यंकट वाघमारे, तुकाराम माने, संतोष भालेराव, शुभम टेकाळे, परवेज पटेल, विनोद गडीमे, डॉ. संतोष भडीकर, अनिल सूर्यवंशी, रवी नाईकवाडे, मजहर पटेल, प्रसाद साळुंके, किशोर साळुंके यांच्यासह दोन्ही प्रभागातील नागरिक व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लातूर ग्रामीणच्या भाजपा कार्यकर्त्यांनी महानगरपालिका निवडणुकीत जिद्दीने कार्यरत राहावे - आ. रमेशअप्पा कराड



दै. अदिती एक्सप्रेस

लातूर - लातूर महानगरपालिकेवर भाजपाचा झेंडा फडकणार असून या विजयात प्रभाग दहा आणि आकरा मधील सर्व आठही उमेदवार सर्वाधिक मताधिक्याने विजयी व्हावेत यासाठी लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भाजपाच्या कार्यकर्त्यांनी जिद्दीने जोमाने काम करावे असे आव्हान भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाचे प्रमुख पदाधिकारी लोकप्रतिनिधी यांची लातूर महानगरपालिका निवडणूक अनुषंगाने भाजपाच्या संवाद कार्यालयात आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीस माजी आमदार ॲड. त्र्यंबकनाना भिसे, माजी नगराध्यक्ष विक्रमसिंह चव्हाण यांच्यासह लातूर मनपा निवडणुकीतील प्रभाग दहा आणि आकरा मधील भाजपाचे उमेदवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

वर्षानुवर्ष निवडून येणाऱ्या काँग्रेसच्या आमदारांनी लातूर शहराच्या विकासासाठी काय केले असा प्रश्न उपस्थित करून या बैठकीत बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, केंद्रात आणि राज्यात भाजपाची सत्ता आहे. लातूरात ही भाजपाची सत्ता येणे काळाची गरज असून लातूरच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि विकासासाठी भाजपा शिवाय पर्याय नाही हे मतदारांना पटवून द्यावे.

प्रभाग दहा आणि आकरा हे दोन्ही प्रभाग माझ्यासाठी प्रतिष्ठेचे असून विकासाच्या मुद्द्यावर मते मागून या प्रभागातील दहशत मोडीत काढावी, लातूर शहराच्या प्रगतीत योगदान देणाऱ्या आणि सर्वसामान्यांच्या हिताचे रक्षण करणाऱ्या नगरसेवकांना विजयी करण्यासाठी लातूर ग्रामीण मधील भाजपाच्या कार्यकर्त्यांनी प्रचार यंत्रणेचे सूक्ष्म नियोजन करून मताधिक्य वाढविण्यासाठी मेहनत घ्यावी असेही अव्हान भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले आहे.

या बैठकीत विक्रमसिंह चव्हाण यांनी प्रचार यंत्रणेच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण सूचना केल्या तर भाजपाच्या उमेदवार सौ. रागीणी यादव आणि हरीओम भगत यांनी प्रभागातील माहिती सांगून प्रचार यंत्रणेत लातूर ग्रामीण मधील भाजपाचे सर्व पदाधिकारी सहभागी होत असल्याबद्दल ऋण व्यक्त केले. बैठकीचे प्रास्ताविक चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी उमेदवार प्रविणकुमार अंबुलगेकर यांनी आभार मानले. या बैठकीस उमेदवार अभिजीत पाटील, धर्मे द्रसिंग चव्हाण, सौ. हेमांगी येळे, सौ. पूजा कांबळे, सौ. पूजाताई चौगुले यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी नवनाथ भोसले, भागवत सोट, महेंद्र गोडभरले, प्रताप पाटील, शरद देरेकर, सुरज शिंदे, उद्धव काळे, सतीश आंबेकर, गोविंद नरहरे, बन्सी भिसे, साहेबराव मुळे, महादेव मुळे, शामसुंदर वाघमारे, दीपक वांगसकर, विजय काळे, ॲड. मनोज कराड, रवींद्र नागरगोजे, वसंत करमुडे, ललिता कांबळे, सुरेखा पुरी, शीला आचार्य, अच्युत कातळे, अशोक सावंत, ओम चव्हाण, भागवत गीते, प्रभाकर माळी, नारायण राठोड, बाबासाहेब भिसे, भैरवनाथ पिसाळ, विश्वास कावळे, श्रीमंत नागरगोजे, आदिनाथ मुळे, नाना कस्पटे, भाऊसाहेब गुळबिले, सचिन लटपटे, राजकुमार आलापुरे, उत्तम चव्हाण, ज्ञानेश्वर जुगल, उज्वल कांबळे, प्रशांत शिंदे, संजय ठाकूर, लक्ष्मण खलंग्रे, दत्तात्रय सप्ताळ, अहमद शेख, पद्माकर होळकर यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून

देवेंद्र फडणवीसांचा...

आम्ही जनतेचे स्वीकारतो आणि सर्वांना धन्यवाद देतो. प्रत्येक शहराचा सर्वांगीण विकास करण्याचा आमचा प्रयत्न असेल, असे आश्वासन फडणवीसांनी दिले.

सोनिया गांधी...

रुग्णालयाच्या माहितीनुसार, त्यांना पोटाच्या त्रासामुळे रुग्णालयात आणण्यात दाखल करण्यात आले होते. गेल्या काही काळापासून सोनिया गांधी यांच्या प्रकृतीत चढ-उतार दिसून येत आहेत. त्याआधीच्या काही दिवसांपूर्वी हिमाचल प्रदेशात त्यांची प्रकृती बिघडली होती, तेव्हा त्यांना शिमला येथील इंदिरा गांधी मेडिकल कॉलेजमध्ये नेण्यात आले होते.

काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर...

या विधानामुळे बजरंग दल आणि त्याच्या कार्यकर्त्यांची सामाजिक प्रतिमा आणि प्रतिष्ठा धोक्यात आल्याचंही तक्रारीत नमूद करण्यात आलं आहे. या युक्तिवादाची दखल घेत न्यायालयाने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २०२ अंतर्गत भांडुप पोलिसांना प्राथमिक चौकशीचे आदेश दिले असून, १७ फेब्रुवारीपर्यंत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

लाल किल्ल्याजवळील....

दानिशचा उमर नबीने आत्मघाती बॉम्बर बनण्यासाठी ब्रेनवॉश केल्याचा दावा तपास यंत्रणेकडून करण्यात आला आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये तो कुलगाम येथील एका मशिदीत डॉक्टर मॉड्यूलला भेटण्यासाठी तयार झाला होता. त्यानंतर त्याला हरियाणातील फरीदाबाद येथील अल फलाह विद्यापीठात राहण्यासाठी नेण्यात आले.

लाल किल्ल्याजवळ चालत्या कारमध्ये स्फोट

१० नोव्हेंबर रोजी लाल किल्ल्याजवळ एका चालत्या कारमध्ये भीषण बॉम्बस्फोट झाला होता. या स्फोटात १३ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले होते. ही कार कथित आत्मघाती बॉम्बर उमर उन नबी चालवत असल्याची माहिती एनआयएच्या फॉरेन्सिक तपासातून समोर आली आहे.

उमर उन नबी हा जम्मू-काश्मीरच्या पुलवामा जिल्ह्यातील रहिवासी होता. तो फरीदाबाद येथील अल फलाह विद्यापीठात जनरल मेडिसिन विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत होता. या स्फोटप्रकरणाचा तपास एनआयएने अधिक तीव्र केला असून, आरोपींच्या नेटवर्कचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.

अमेरिकेत..

अशी विनंती त्यांनी केली आहे.

यशस्वी करिअर आणि स्वप्नांचा अंत

निकिता ही एक अत्यंत हुशार मुलगी होती. तिने बाल्टिमोर काउंटीमधील युनिव्हर्सिटी ऑफ मेरीलँडमधून मास्टर पदवी मिळवली होती. फेब्रुवारी २०२५ पासून ती 'व्हेडा हेल्थ'मध्ये कार्यरत होती आणि तिने अलीकडेच 'ऑल-इन अवॉर्ड' देखील पटकावला होता. २०२६ मध्ये नव्या जोमाने काम करण्याची तिची स्वप्ने होती, मात्र त्याआधीच क्रूरपणे तिचा अंत करण्यात आला.

किल्लारीच्या निळकंठेश्वर...

सहकारी व सभासद ऊस उत्पादक शेतकरी बांधवांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे.यंदाच्या गळीत हंगामात कारखान्याने ३ लाख ते ३ लाख ५० हजार मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवून काम सुरू ठेवले आहे. कारखान्याच्या दैनंदिन साखर उताऱ्याने १२.०५ टक्क्यांपर्यंत मजल मारली असून सरासरी साखर उतारा १०.७५ टक्के इतका समाधानकारक आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कारखान्याच्या यशस्वी कामगिरीत नवीन 'नॅचरल शुगर' बी. बी. ठोंबरे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. तसेच वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटने तांत्रिक सल्लागार म्हणून बजावलेली भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. कारखान्यातील संपूर्ण मशिनरीचे नूतनीकरण करण्यात आल्याने कारखाना सध्या सुस्थितीत व कार्यक्षमतेने सुरू आहे.आमदार अभिमन्यू पवार यांनी हा कारखाना पुन्हा सुरू करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करून आवश्यक मदत मिळवून दिली. त्या मदतीच्या आधारे कारखान्याचे पुनर्जीवन करण्यात आले. गेल्या अनेक वर्षांपासून बंद असलेला हा कारखाना सहकारात पुन्हा सुरू झाल्याने लातूर व धाराशिव जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी ही मोठी दिलासादायक व आनंदाची बातमी ठरली आहे.

किल्लारीच्या निळकंठेश्वर साखर कारखान्याने ४४ दिवसांत १ लाख मेट्रिक टन ऊस गाळप पूर्ण करून सहकाराच्या ताकदीचे दर्शन घडविले असून आगामी काळात उद्दिष्टपूर्तीच्या दिशेने कारखाना वेगाने वाटचाल करीत राहील, असा विश्वास शेतकरी व सभासदांकडून व्यक्त होत आहे.

श्री निळकंठेश्वराचे आशीर्वाद आणि शेतकरी बांधवांचा विश्वास याच्या बळावर किल्लारीचा निळकंठेश्वर सहकारी साखर कारखाना पुन्हा उभा राहिला आहे. अवघ्या ४४ दिवसांत १ लाख मेट्रिक टन ऊस गाळप पूर्ण होणे ही सहकाराची ताकद दर्शवते. केंद्रीय मंत्री मा. अमित शहा, मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्र्यांनी कारखाना सुरू करण्यासाठी मोलाची मदत केली, त्यामुळेच हे अशक्य वाटणारे कार्य शक्य झाले. अधिकारी, कर्मचारी व शेतकऱ्यांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे.

आमदार अभिमन्यू पवार

पत्रकार समाजाचा...

चाकूरचे पत्रकार समाजाला न्याय देण्याचा कायम प्रयत्न करत असतात. चाकूर च्या पत्रकारांनी सामाजिक बांधिलकी समजून पत्रकारांच्या कुटुंबीयांची व इतर नागरिकांची तपासणीत कार्यक्रम हाती तर घेतलाच तसेच त्यांच्या सुरक्षितेसाठी हेल्मेट वाटपाचा हा स्तुत्य उपक्रम असल्याचे सुद्धा सहकार मंत्री ना पाटील म्हणाले. पत्रकार हा प्रशासन व लोकप्रतिनिधी मधला दुवा असतो त्यांच्यामुळेच आम्हाला काम करण्यास अधिक सोयीस्कर होते असे सहकार मंत्री ना . पाटील म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संग्राम वाघमारे यांनी केले. तसेच व्हॉइस ऑफ मीडियाचे तालुकाध्यक्ष विनोद निला, नरसिंह घोणे, माजी सभापती ज्योती स्वामी, सरपंच डॉ. भालचंद्र चाटे, यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत शेटे,गणेश स्वामी यांनी केले.

दर्पण दिनाच्या कार्यक्रमासाठी पत्रकार संघाचे सचिव संजय पाटील, संगमेश्वर जनगावे, माधव वाघ, माधव तरगुडे, शिवशंकर टाक, सदाशिव मोरे, राजकुमार जगताप, अशोक बिराजदार, साखराप्पा वाघमारे, दयानंद सूर्यवंशी, दत्ता मेहकरे, सुशील बाघमारे, विकास स्वामी, दतात्रय बेबडे, सतीश गाडेकर, किशन वडारे, पांडुरंग साळुंके, युसूफ शेख, , चेतन होळदांडगे, बसवेश्वर जनगावे, दीपक पाटील, सुनील जाधव, नवनाथ डिंगोळे, रियाज मणियार, गजानन चेऊलवार, बालाजी काटमपल्ले, देविदास हेमनर सह आदींनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कृषी महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

राष्ट्रीय काँग्रेस...

या निवडणुकीत विरोधकाकडून अतिशय घाणेरडे राजकारण केले जाते आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष लातुर मध्ये येऊन आदरणीय विलासराव देशमुख साहेबांच्या आठवणी पुसून टाकण्याची भाषा करीत आहेत हीच शोकांतिका आहे.

आदरणीय विलासराव देशमुख साहेबांचे नाव,त्यांच्या आठवणी शिवाय आपले भाषण पूर्ण तर होतच नाही पण भाजपचे सुद्धा भाषण आदरणीय विलासराव देशमुख साहेबांचे नाव घेतल्या शिवाय पूर्ण होत नाही हेच यातून दिसले.

लातुर मनपा निवडणूकिसाठी आपल्या समोर प्रभाग १० व प्रभाग ११ मधून जे उमेदवार काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीने दिले आहेत ते आपल्या कामाची सर्वसामान्य कुटुंबातील माणसे आहेत असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना आमदार अमित देशमुख म्हणाले की, सद्या राज्यात भाजप राष्ट्रवादी काँग्रेस ला,राष्ट्रवादी शिवसेनेला आणि शिवसेना भाजपला भ्रष्ट म्हणणे सुरू आहे त्याच्यात एकमेकांना भ्रष्ट म्हणण्याची चढाओढ लागली आहे असेच लातुर मध्ये सुरू आहे. लातुरातही रात्रीतून पक्ष बदलन्याचे प्रकार झाले यांना काँग्रेस पक्षाने अनेकदा उमेदवारी दिली, पदे दिली पण त्यांनी रात्रीतून उमेदवारी मिळाली नाही म्हणून विरिधकाचे दार गाठले आशा लोकापासुन आपण सावध राहावे.महिलांना मोफत सिटीबस आम्ही सुरू केली आणि सरकारच्या प्रशासकाने ती बंद केली पण आमची सत्ता येताच मोफत सिटीबस पुन्हा सुरू केली जाईल असा शब्द त्यांनी यावेळी दिला. आज कायदा सुव्यवस्था बिघडली आहे,ड्रग अमली पदार्थ विक्री केले जात आहे,मनपात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार वाढला आहे यासर्व गोष्टींचा हिशोब विचारण्याची वेळ आता अली असून आजची ही सभा आणि आपली लक्षणीय उपस्थिती पाहून ही प्रचार सभा की विजयी सभा आहे असा प्रश्न निर्माण झाल्या शिवाय राहत नाही.आपल्या सर्वांच्या मनातील विकासाचे जे स्वप्न आहे ते आमचे सर्व उमेदवार मनपात निवडुन गेल्यानंतर निश्चित पूर्ण करतील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.तसेच येणाऱ्या काळात आपल्या भागात सुभेदार रामजी यांचा पुतळा उभारायचा असून यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत असेही ते म्हणाले.

यावेळी बोलताना वंचित बहुजन आघाडीचे मुफ्ती सय्यद वसीम म्हणाले की, आपल्या देशाला पवित्र संविधान परमपूज्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिले तर इंग्रज्यांच्या जुलमी राजवटीपासून महात्मा गांधी यांनी चलेजावचा नारा देत काँग्रेस ने आंदोलनकेले आशा सर्वधर्म समभावाची शिकवण देणाऱ्या काँग्रेस आणि वंचित बहुजन अघडीच्या सर्व उमेदवाराणा बहुमताने लातुर महानगरपालिका निवडणूककित विजयी करून पाठवावे असे आवाहन त्यांनी केले.

Printed by, Owned by, Published by & Edited by GANGADHAR ABHANG DIGOLE , Printed by GHONE NARASHINHA PANDURANG, Printed at Magic Publication, Shop No.10, MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, Tq.& Dist. LATUR - 413512 & Published at H.No.255, Shri SAI SCHOOL NEAR, Sona Nagar, Barshi Road, LATUR, DIST- LATUR-413512 Tq.& Dist. PARBHANI - 431401 MAH. Editor : GANGADHAR ABHANG DIGOLE RNINO.MHMAR/25/A1409

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक- गंगाधर अभंग डिगोळे यांचे करीता घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १० मनपा शॉपिग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय घर नं. २५५, श्री साई स्कूल निअर सोना नगर, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातूर . - ४१३५१२, येथे प्रकाशित केले. संपादकः गंगाधर अभंग डिगोळे मो.९४०५२९५२०, ९०२८८४५२३३ RNINO.MHMAR/25/A1409

मराठवाडा मुक्तीसंग्रामातील स्वामी रामानंद तीर्थ यांच्या त्यागाचे विस्मरण होऊ नये: मा.डॉ.शिरीष खेडगीकर



दै. अदिती एक्सप्रेस

कळंब : विद्यार्थी विकास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आणि शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय (मराठी विभाग) यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमाला संपन्न झाली.

या कार्यक्रमाचे उद्घाटन ज्ञान प्रसारक मंडळ संस्थेचे सचिव डॉ. अशोकराव मोहेकर यांनी केले. स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमाला ५ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आली होती, त्या अंतर्गत भारतीय स्वातंत्र्याची तिसरी लढाई:मराठवाडा मुक्तिसंग्राम या विषयावर पुष्प गुंफताना मा.डॉ.शिरीष खेडगीकर (स्वामीजींचे पुतणे) (स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था, छत्रपती संभाजी नगर) म्हणाले, स्वामी रामानंद तीर्थ हे एक व्रतस्थ संन्यासी, शिक्षक आणि हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे नेतृत्व करणारे चळवळकर्ते होते. त्यांनी तत्कालीन संस्थानात स्वातंत्र्य, समता आणि बंधुता अशी नैतिक मूल्ये रुजवली आणि समाजसेवेची प्रेरणा दिली. भारताला स्वातंत्र्य मिळाले होते, परंतु काही तत्कालीन जुनागड, हैद्राबाद संस्थान अशी काही संस्थाने स्वातंत्र्यामध्ये विलीन झाली नव्हती. त्यांचा लढा मात्र कायम सुरूच होता. तत्कालीन सामाजिक परिस्थिती पाहता मराठवाड्याच्या नेतृत्वामध्ये स्वामी रामानंद तीर्थ, बाबासाहेब परांजपे, गोविंदभाई श्रॉफ आदींनी लोकांना संघटित करून मराठवाडा मुक्तीसंग्राम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. या निमित्ताने विद्यार्थ्यांना मराठवाडा मुक्तीसंग्रामातील स्वामी रामानंद तीर्थ यांच्या त्यागाचे विस्मरण होऊ देऊ नये.

दुसरे व्याख्याते श्री विवेक सौताडेकर (लातूर जिल्हा शासकीय इतिहास संशोधक मंडळ सदस्य) म्हणाले, प्रचंड संघर्षाच्या माध्यमातून हा असलेला मराठवाडा निजामाच्या तावडीतून मुक्त झाला आणि बहुजनांच्या व्यक्तीस्वातंत्र्यात भर पडली. प्रत्येकाला सामाजिक न्यायाची जाणीव झाली. त्यांनी मराठवाडा विद्यार्थ्यांना मुक्तीसंग्रामाचा इतिहास, मागच्या पिढ्यांचा त्याग आणि समर्पण समजून घेणे गरजेचे असल्याचे मत मांडले. उस्मानाबाद जिल्हा अग्रेसर होता, कारण तत्कालीन मराठवाड्याच्या मुक्ती लढ्यात उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये लातूरचाही समाविष्ट असल्यामुळे तो क्षेत्रफळाने मोठा असलेला भूभाग होता. यामध्ये या निजामाच्या अन्यायी आणि अत्याचाराच्या लढ्यात युवकांची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची राहिलेली आहे. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे संचालक डॉ.डी.एस.जाधव, उपप्राचार्य डॉ. के.डी.जाधव,प्रा.जयंत भोसले तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हेमंत भगवान यांची उपस्थिती होती. सदर व्याख्यानमालेची सुरुवात संस्थेचे संस्थापक पूज्य ज्ञानदेव मोहेकर गुरुजींच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. पाहुण्यांचे स्वागत बुके, शाल आणि आदर्श मराठी व्याकरण आणि लेखन (पृ.२७४) हे पुस्तक देऊन करण्यात आले. डॉ. ईश्वर राठोड, प्रा. शाहरुख शेख, डॉ. बालाजी वाघमारे डॉ. जयवंत ढोले, प्रा. राम दळवी, डॉ. एन. एम. अदाटे, डॉ.मीनाक्षी जाधव, प्रा. ए.आर. मुखेडकर, प्रा. दीपक वाळके, डॉ.विश्वजित मस्के, प्रा.सुषमा घाटपारडे,प्रा.लोहकरे, प्रा.वाघमा रे उपस्थित होते.

प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ.दादाराव गुंडरे, सूत्रसंचालन व्याख्यानमाला समन्वयक प्रा.डॉ.दीपक सूर्यवंशी यांनी तर आभारप्रदर्शनात डॉ.एन.एम.साठे यांनी विद्यार्थी विकास मंडळ संचालक डॉ. कैलास अंभुरे यांचेही तसेच उपस्थितांचेही आभार मानले. यावेळी बहुसंख्यने विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते. व्याख्यानमालेच्या यशस्वीतेसाठी प्रबंधक श्री हनुमंत जाधव, संतोष मोरे आणि अरविंद शिंदे यांनी सहकार्य केले.

वलांडी येथे पत्रकार दिनानिमित्त कार्यक्रम संपन्न



दै. अदिती एक्सप्रेस

वलांडी प्रतिनिधि - देवणी : तालुक्यातील वलांडी येथे मराठी पत्रकार दिनानिमित्त उत्साहात कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाची सुरुवात आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.या कार्यक्रमात पत्रकारांच्या सामाजिक योगदानाचा गौरव करण्यात आला. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारांनी सत्य, निर्भय व निःपक्षपातीपणे काम करावे, असे प्रतिपादन मान्यवरांनी यावेळी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्र सेवादलाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित शिंदे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून नवराष्ट्रचे आवृत्ती प्रमुख जयप्रकाश दगडे,मराठी पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष महादेव कुंभार, पोलिस उपनिरीक्षक गोपाळ वऱ्हाडे व नागरिक उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी पत्रकार दिनाचे महत्त्व सांगत समाजप्रबोधन, प्रशासन व नागरिकांमधील दुवा म्हणून पत्रकारांची भूमिका अधोरेखित केली. ग्रामीण भागातील प्रश्न मांडताना पत्रकारांनी संवेदनशीलता व जबाबदारी जपावी, असे आवाहनही करण्यात आले.

यावेळी स्थानिक पत्रकारांचा सामाजिक कार्यकर्ते अरूण भगवानराव पाटील यांच्यावतीने शाल,पुष्पगुच्छ,दक्षिणेचा प्रबुद्ध महात्मा बसवेश्वर ग्रंथ देऊन गौरव करण्यात आला. पत्रकार आनंद अंकुलगे यांना मराठी पत्रकार संघ उदगीर यांच्या यंदाचा उत्कृष्ट राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाल्यानिमित्ताने विशेष सत्कार करण्यात आला.विविध वक्त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नरेश बिरादार व आभारप्रदर्शन बालाजी कवठाळे यांनी केले. कार्यक्रमास देवणी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष रमेश कोतवाल,व्हॉईस ऑफ मीडिया अध्यक्ष रेवण मळभागे,ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष हसन मोमीन,सतिश बिरादार, बाबासाहेब उमाटे, महेश कंजे,नरेश बिरादार,दत्ता पाटील,गिरीधर गायकवाड,प्रमोद लासोने,माधव मुर्गे,शादुल बौडीवाले,आनंद अंकुलगे,नियाज मुर्शेद,गुरूनाथ हिप्पळनारे,बाळू तिपराळे, रियाज मोमीन,अजिज सौदागर, विलास वाघमारे,अक्रम शेख,अहमद पठाण,सगीर मोमीन,इस्माईल शेख, भैय्यासाहेब देवणीकर, राहुल बालुरे,लक्ष्मण रणदिवे, सचिन मंगनाळे,शकील मणियार, निलेश गायकवाड,दाउद तांबोळी,आकाश डोंगरे तसेच यावेळी स्नेह भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. या कार्यक्रमासाठी ग्रामस्थ,सामाजिक कार्यकर्ते व मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री पांडुरंग विद्याल बालविवाह न करण्याची सामूहिक प्रतिज्ञा

मनेश पाटील

उदगीर / प्रतिनिधी -कल्लूर येथील श्री पांडुरंग विद्यालय येथे बालविवाह न करण्याची प्रतिज्ञा उत्साहात घेण्यात आली. या उपक्रमात विद्यालयातील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवित बालविवाहमुक्त समाजनिर्मितीचा निर्धार केला.

यावेळी उपस्थितांनी आम्ही मुलींचे लग्न १८ वर्षांच्या आत व मुलांचे लग्न २१ वर्षांच्या आत करणार नाही, बालविवाहाच्या कोणत्याही कार्यात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभागी होणार नाही, तसेच बालविवाहामुळे शैक्षणिक, सामाजिक, मानसिक व शारीरिक आयुष्यावर होणारे दुष्परिणाम



ओळखून त्यास विरोध करू अशी ठाम प्रतिज्ञा घेतली.

बालविवाह हा कायदेशीर गुन्हा असून त्यासाठी कठोर शिक्षा आहे, याची जाणीव सर्वांनी व्यक्त केली. बालविवाहाची माहिती मिळाल्यास तात्काळ Childline १०९८ या क्रमांकावर संपर्क करून प्रशासनास सहकार्य करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. तसेच मित्र, नातेवाईक व गावपातळीवर बालविवाह होऊ नये यासाठी दक्षता घेण्याचा निर्धार उपस्थितांनी केला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांचा एकच नाराबालविवाह मुक्त लातूर सारा! असा एकमुखी नारा देत समाजजागृतीचा संदेश देण्यात आला.

वलांडीत पहिल्यांदाच तब्लिगी उमूमी इज्तेमा; १५ हजार भाविकांसाठी भव्य व्यवस्था, ऐक्यबंधुत्वाचा संदेश

दै. अदिती एक्सप्रेस

वलांडी प्रतिनिधी - देवणी तालुक्यातील वलांडी येथे दि. ७ व ८ जानेवारी २०२६ रोजी (बुधवार व गुरुवार) पहिल्यांदाच तब्लिगी उमूमी इज्तेमा आयोजित करण्यात आला असून, या दोनदिवसीय धार्मिक संमेलनासाठीची व्यापक तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. देवणी तालुक्यासह वलांडी, गुरनाळ, मोघा, उदगीर, पंचक्की, मुसानगर तसेच कर्नाटक सीमाभागातून हजारो भाविक या इज्तेमाला उपस्थित राहणार आहेत.

निलंगाउदगीर राज्य मार्गालगत असलेल्या उस्मानिया कॉलनी येथील ८ ते ९ एकर जागेवर हा इज्तेमा होत असून, एकूण १२ ते १३ एकर क्षेत्रात भव्य मांडणी करण्यात आली आहे. सुमारे ३५ हजार स्क्वेअर फुटांचा भव्य मंडप उभारण्यात आला असून, एकावेळी १५ ते २० हजार भाविक बसू शकतील अशी उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे.

भाविकांच्या सोयीसाठी १०० वजुखाने, ४० स्वच्छतागृहे, २० शौचालये, ५ बाथरूम्स, तसेच मुबलक पाणी व अखंड वीजपुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली आहे. वाहन पार्किंगसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्यात आल्या असून, या निमित्ताने हिंदूमुस्लिम ऐक्याचे सुंदर दर्शन घडत आहे.

या इज्तेमाच्या यशस्वी आयोजनासाठी २०० ते ४०० स्वयंसेवक रात्रंदिवस श्रमदान करत असून, अनेक दानशूर व्यक्तींनी अन्नधान्य व आवश्यक साहित्य स्वरूपात मदत केली आहे. इज्तेमामधून शिस्त, साधेपणा, बंधुता व एकात्मतेचा संदेश देण्यात येणार आहे.

दि. ८ जानेवारी रोजी रात्री ९ वाजता दुआने इज्तेमाची सांगता होणार असून, त्यानंतर काही जमाती धार्मिक दौऱ्यासाठी रवाना होणार आहेत. इज्तेमाच्या काळात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासन व ग्रामपंचायतीकडून सतत आढावा घेतला जात आहे.

भाजपाच्या अटल संमेलनास कार्यकर्त्यांचा प्रतिसाद



परंडा (प्रतिनिधी) परंडा येथे भारतीय जनता पार्टीच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या अटल संमेलनास प्रतिसाद मिळाला, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जिल्हा परिषद आणि पंचायत समिती भाजपा ताकदीने लढवणार असून प्रत्येक जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गणातून इच्छूक उमेदवारांकडून परिचय पत्र देण्यात आले आहेत.

यावेळी माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी संघटनात्मक बांधणी करुन येणाऱ्या निवडणुकीत भाजप मोठ्या ताकदीने लढवणार असल्याचे सांगितले. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, जिल्हा संघटन सरचिटणीस ॲड. नितीन भोसले, ॲड. गणेश खरसडे, जिल्हा उपाध्यक्ष ॲड. संतोष सुर्यवंशी, तालुकाध्यक्ष अरविंद रगडे, ॲड. जहीर चौधरी, सुखदेव टोंपे, ता. सरचिटणीस धनाजी गायकवाड, तानाजी पाटील, अर्जुन शिंदे, राजाभाऊ चौधरी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'महात्मा बसवेश्वर'चा मतदान जनजागृती वाकेथॉनमध्ये शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर / प्रतिनिधी- लातूर शहर महानगरपालिका, लातूर रोटरी क्लब परिवार, महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, व्यक्तिमत्त्व विकास केंद्र, युवती मंच आणि कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर शहर महानगरपालिका अंतर्गत क्रीडा संकुल ते टाऊन हॉल पर्यन्त निघालेल्या मतदान जनजागृती वाकेथॉनमध्ये शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या रॅलीत महात्मा बसेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी, डॉ. गुणवंत बिरादार, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, प्रा. किसनाथ कुडके, प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. रवी सोनोने, प्रा. के. आर. सूर्यवंशी, प्रा. के. आर. बिराजदार, प्रा. आशीष क्षीरसागर, प्रा. रवींद्र सुरवसे, प्रा. उदयकुमार धनुरे, प्रा. आशिष स्वामी, प्रा. कल्पना गिराम, प्रा. डॉ. अश्विनी रोडे, प्रा. रूपाली हलवाई, प्रा. मीनाक्षी नीला, प्रा. नीता दलगडे, प्रा. पूजा घार, प्रा. महादेवी धडे आणि संगमेश्वर मुळे यांच्यासह महाविद्यालयातील



निवडणुकीचा २०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या रॅलीत लोकशाहीमधील मतदानाचे महत्त्व सांगणाऱ्या घोषणा, कट आउट, बॅनर लावून येत्या १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या महानगरपालिका मतदानाचा टक्का वाढावा याकरिता जनप्रबोधन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त आणि उत्साही सहभागाबद्दल महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे, मुख्य समन्वयक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

असंघटीत महिलांसाठी सहकारी पतसंस्था ही काळाची गरज - गवारे

धाराशिव (प्रतिनिधी) असंघटित श्रमिक महिलांच्या विकासासाठी सरकारच्या अनेक योजना राबविण्यात येत आहेत. महिला प्रत्येक क्षेत्रात वाटचाल करीत आहेत. श्रमिक महिलांनी सहकारच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबी व्हावे. त्यासाठी श्रमिक महिलांच्या पतसंस्था ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन मराठा महासंघाचे माजी जिल्हाध्यक्ष नंदकुमार गवारे यांनी दि.५ जानेवारी रोजी केले. दरम्यान, सोसायटीचे उद्घाटन अंकुश कृष्णाजी भालेराव यांच्या हस्ते करण्यात आले.

धाराशिव शहरातील सांजा रोड लगत असलेल्या शिवाजी नगर येथील रमाई सदनात श्रमिक महिला को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी श्रीहरी चौहान, भाजपाचे राजसिंह राजेनिंबाळकर व आनंद भालेराव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी संस्थेच्या अध्यक्ष अनिता आनंद भालेराव, उपाध्यक्ष शाहीन जाकेर शेख, संस्थेच्या संचालक सुवर्णा जवाहर कांबळे, महादेवी बाळासाहेब माळी, शैला प्रसाद दसपुते, सोनाली किरण नेटके, छाया हनुमंत मुठाळ, वैशाली अमोल शिंदे, कविता नीलम चंदनशिवे, अंजली आनंद भालेराव आदींची



प्रमुख उपस्थिती कॅशियर होती. प्रारंभी जिजाऊ माँ साहेब, सावित्रीबाई फुले, माता रमाई आंबेडकर आणि अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वतंत्र मजूर जनरल कामगार संघटना (महाराष्ट्र राज्य) व युनिक बहुउद्देशीय सामाजिक संघटना तथा क्रेडिट सोसायटीचे व्यवस्थापकीय संचालक ए. ए. भालेराव यांनी तर सूत्रसंचालन व आभार शरीफ शेख यांनी मानले. यावेळीयावेळी सविता धनंजय बनसोडे, कविता घुले, मीना मगर, मनीषा मस्के, सायरा तांबोळी, शबनम शेख, भावना मेंढे, अश्विनी काळे, सविता मेंढे, इरशाद शेख, आनंद भालेराव, अबोली भालेराव, संस्थेचे पदाधिकारी, सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जागरूक ग्राहक हाच बाजारपेठेचा राजा असतो-डॉ. डी.बी. कोनाळे

दै. अदिती एक्सप्रेस

(पाटील मनेश)

उदगीर - उदगीर -ग्राहकांना सदोष उत्पादने, सदस्य सेवा आणि अनुचित व्यापार पद्धती पासून संरक्षण देण्यासाठी ग्राहक संरक्षण कायदा बनविण्यात आला आहे. या कायद्याचा मुख्य उद्देश ग्राहकांच्या हक्काचे प्रभावी संरक्षण करणे व तक्रार निवारण करणे हा आहे. त्यासोबतच या अंतर्गत ग्राहकांना जागरूक करण्याचा प्रयत्न केला जातो. कारण ग्राहक दक्ष राहिला पाहिजे. त्याला आपल्या हक्काची जाणीव असली पाहिजे.जागरूक ग्राहक हाच बाजारपेठेचा राजा असतो असे मत डॉ. डी. बी. कोनाळे यांनी व्यक्त केले. ते छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालय,



उदगीर व तहसील कार्यालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने ग्राहक दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमांमध्ये बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उदगीरचे तहसीलदार राम बोरगावकर होते तर व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्र-प्राचार्य डॉ. आर. एम. मांजरे, ग्राहक पंचायत लातूरचे दत्तात्रय मिरकले पाटील, इत्यादी उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. कोनाळे यांनी ग्राहक संरक्षण कायदा १९८६ व नवीन कायदा २०१९ मधील तरतुदी सांगितल्या. तसेच डिजीटल न्यायप्रणालीद्वारे कार्यक्षम आणि जलद न्याय यासाठी ऑनलाईन तक्रार पोर्टल - ई दाखील - ई जागृती यांचा प्रभावी वापर यावर माहिती दिली. याप्रसंगी डॉ. आर. एम. मांजरे व मिरकले पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात तहसीलदार राम बोरगावकर यांनी ग्राहक संरक्षण कायद्याचे महत्त्व स्पष्ट केले. प्रा बालाजी सूर्यवंशी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तर सुमित्रा इलमले यांनी आभार व्यक्त केले. याप्रसंगी शहरातील व्यापारी, आशा कार्यकर्त्या व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांच्या उपस्थितीत नगराध्यक्षा सौ.स्वाती हुडे यांनी पदभार स्विकारला



दै. अदिती एक्सप्रेस
मनेश पाटील

उदगीर / प्रतिनिधी- माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली उदगीर नगर परिषद सार्वत्रिक निवडणुक - २०२५ मध्ये भारतीय जनता पार्टी व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या युतीचा दणदणीत विजयी होवुन थेट जनतेतून उदगीर नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदी सौ.स्वाती सचिन हुडे या मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्या त्यामुळे त्यांचा काल दि.५ जानेवारी रोजी माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांच्या उपस्थितीत नगराध्यक्षा सौ. स्वाती सचिन हुडे यांनी नगराध्यक्ष पदाचा पदभार स्विकारला. यावेळी आ.संजय बनसोडे यांनी त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देवून सत्कार करुन शुभेच्छा दिल्या.

यावेळी शहरातील २० प्रभागातील ४० नवनिर्वाचित नगरसेवकांचा नगर परिषद प्रशासनाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी माजी आमदार गोविंदराव केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निट्रुरे, माजी नगराध्यक्ष बस्वराज बागबंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य राहुल केंद्रे, माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, भगवानराव पाटील तळेगावकर, सुधीर भोसले, माजी नगरसेवक सचिन हुडे, मंजुर पठाण, ज्येष्ठ नागरिक शंकर हुडे, वसंत पाटील, सय्यद जानीमियाँ, शशिकांत बनसोडे,अमोल अनकल्ले आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार संजय बनसोडे यांनी, आज पासून नगराध्यक्षासह सर्व नगरसेवकांनी जनतेची सेवा करण्यासाठी तत्पर राहून सेवा करावी व आपली नगर परिषद ही लातूर जिल्ह्यात नंबर एकची नगर परिषद म्हणून नावारुपाला आणावे असे आवाहन केले. जगाच्या नकाशावर आपल्या उदगीरची एक नवी ओळख निर्माण झाली असुन आपली संस्कृती जपण्याचे काम आपण सर्वांनी करावे. विकासाच्या कामासाठी हातात हात घालुन काम करा आणि शहरातील सर्वसामान्यांना मूलभूत सुविधा पुरवा असे सांगितले. येत्या सहा महिन्याच्या आत नुतन इमारतीच्या कामाला सुरुवात करणार असुन एक भव्य दिव्य व देखणी इमारत आपण उभारणार असलचयाचेही आ.संजय बनसोडे यांनी यावेळी सांगितले.

ज्ञान हे माणसाच्या व्यक्तिमत्व विकासाचे साधन आहे : भिक्खु पय्यानंद थेरो

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर / प्रतिनिधी-- जगामध्ये शालेय शिक्षण आणि आध्यात्मिक शिक्षण असे ज्ञानाचे प्रकार आहेत. शालेय ज्ञान हे भौतिक साधनांची परिपुर्तता करते तर आध्यात्मिक ज्ञान हे मनुष्याचे वैचारिक आणि व्यक्तिमत्व उंचावते. ज्ञान हे माणसच्या व्यक्तिमत्व विकासाचे साधन असल्याचे प्रतिपादन भिक्खु पय्यानंद थेरो यांनी केले आहे. पौष पौर्णिमेनिमित्त महाविहार, सातकर्णी नगर येथे आयोजित धम्मदेशना व सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते.



भिक्खू पय्यानंद थेरो पुढे म्हणाले की, ज्ञान हे केवळ उपजीविकेचे साधन नसून ते माणसाच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्व घडवण्याची प्रक्रिया आहे. आजचे शालेय शिक्षण माणसाला कौशल्ये, रोजगार व भौतिक प्रगतीकडे घेऊन जाते; मात्र त्याला पूरक म्हणून आध्यात्मिक शिक्षणाची नितांत गरज आहे. आध्यात्मिक ज्ञानाशिवाय शालेय शिक्षण अपूर्ण ठरते, आध्यात्मिक शिक्षणामुळे मनुष्याला स्वतःकडे पाहण्याची दृष्टी मिळते. विचारांची शुद्धता, आचारातील संयम, करुणा, मैत्री आणि समत्व या मूल्यांची जोपासना आध्यात्मिक ज्ञानातूनच होते असेही ते म्हणाले. कार्यक्रमाची सुरुवात तथागत गौतम बुद्ध, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमांच्या पूजनाने करण्यात आली. त्यानंतर पू. भिक्खू संघाच्या उपस्थितीत त्रिसरण, पंचशील व अष्टशील उपस्थितांनी ग्रहण केले. याप्रसंगी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंतीही उत्साहात साजरी करण्यात आली. सदरील कार्यक्रमास प्रा. शिवशरण हावळे, इंजि. एम. एन. गायकवाड, चेअरमन विठ्ठल जाधव, माजी सरपंच सुनील बनसोडे, सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब कांबळे, पोलीस निरीक्षक इंद्रजीत वर्धन आदि मान्यवर, आठवी अ. भा. बौद्ध धम्मपरिषद यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल महाविहार धम्मसेवक ग्रुप सदस्य आणि डॉ. जितेंद्र वाघमारे यांची पशुसंवर्धन विभागाच्या सहाय्यक आयुक्तपदी पदोन्नती झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. हा संपूर्ण कार्यक्रम भिक्खू पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली शिस्तबद्ध व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. धम्म, शिक्षण व सामाजिक जाणीव यांचा समन्वय साधणारा हा कार्यक्रम उपस्थितांसाठी वैचारिक समृद्धी देणारा ठरला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी केले तर यशस्वीतेसाठी भंते बोधिराज, उदय सोनवणे, अनिरुद्ध बनसोडे, करण ओव्हाळ, सतीश मस्के, राजेश कदम, गौतम आदमाने, यशपाल मस्के, मिलिंद धावारे यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी प्रशांत जानराव, सत्यप्रकाश कांबळे, आम्रपाल बनसोडे, जयंत कांबळे, त्र्यंबक कवठेकर, मारोती सरवदे, अंतेश्वर थोटे, संतोष कसबे, आकाश सरवदे, राहुल शाक्यमुनी, निलेश बनसोडे, विशाल वाहुळे, उत्तम गायकवाड, विलास अवशंख, गौतम चिकाटे, वसंत वाघमारे, कृष्णा सुरवसे, गोविंद जोगदंड, शामल कांबळे, उज्वला सिरसाट, शोभा सोनकांबळे, निर्मला मधाळे, सुरेखा दंडे, निर्मला थोटे, कविता कदम, सरिता बनसोडे, निर्मला गौरकर, कांता सरवदे, पंचशीला बनसोडे, स्वाती सूर्यवंशी, पंचशीला बनसोडे, माया धावारे, यांच्या सह समाजातील प्रतिष्ठित मान्यवर वकील, डॉक्टर, प्राध्यापक, विविध नगरातील महिला मंडळी यांच्यासह मोठ्या संख्येने बौद्ध उपासक उपासिकांची उपस्थिती होती.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी काँग्रेसचे रणशिंग

प्रदेश सचिवा कल्याण पाटील यांच्या उपस्थितीत मंजूरखा यांची उदगीर पालिकेच्या गट नेते पदी निवड

दै. अदिती एक्सप्रेस
मनेश पाटील

उदगीर / प्रतिनिधी-आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पूर्वतयारीसाठी आज उदगीर तालुका काँग्रेस कमिटीची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव मा. कल्यान पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. याप्रसंगी नगरपालिकेच्या काँग्रेस गट नेते पदी मा. मंजूरखा पठाण यांची निवड करण्यात आली.



बैठकीला मार्गदर्शन करताना तालुकाध्यक्ष संतोष बिरादार म्हणाले की, काँग्रेस पक्षाची विचारधारा घराघरात पोहोचवण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज व्हावे. येणाऱ्या काळात जनता जनार्दनाच्या प्रश्नांवर रस्त्यावर उतरून लढा दिला जाईल. यावेळी तालुकाध्यक्ष संतोष बिरादार, नुतन नगरसेवक चंदन पाटील नागराळकर, ओंकार गांजुरे, हुसेन चाऊस मेहबूब भाई शेख, बसवराज पाटील मलकापूरकर गजाजन बिरादार ,नाना ढगे ,महादेव कांबळे मुन्तजिब शेख , राहुल गायकवाड युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष आदर्श पिंपरे, लकी पाटील , बालाजी गायकवाड, अभिजीत माने विपीन पाटील, विराज पाटील, कनिष्क शिंदे, सद्दाम बागवान विविध सेलचे पदाधिकारी आणि निष्ठावान कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

सावित्रीच्या लेकींनी लिहिलेले मराठी कथा साहित्य ग्रंथ प्रदर्शन यशस्वी

मनेश पाटील

उदगीर / प्रतिनिधी- सावित्रीबाई फुले जयंती व वाचन पंधरवड्यानिमित्त महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे आयोजित सावित्रीच्या लेकींनी लिहिलेले मराठी कथा साहित्य या विषयावरील विशेष ग्रंथ प्रदर्शनाचा समारोप उत्साहात झाला.

दोन्ही दिवस (५ व ६ जानेवारी) राज्यशास्त्र विभागासमोर भरविण्यात आलेल्या या प्रदर्शनाला महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर, उपाध्यक्ष, बसवराज पाटील मलकापूरकर, सचिव डॉ. रामप्रसाद लखोटिया, सहसचिव प्रशांत पेन्सलवार, कोषाध्यक्ष



महादेव नौबदे तसेच संस्था सदस्य, प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी व वाचनप्रेमींची प्रचंड गर्दी झाली. प्रदर्शनात सावित्रीबाई फुले यांच्या वारशातून प्रेरित होऊन लिहिलेल्या महिला लेखिकांच्या निवडक मराठी कथासंग्रहांचे आकर्षक प्रदर्शन करण्यात आले होते. जागेवर वाचनाची सोय उपलब्ध असल्याने अनेकांनी त्या वेळीच कथा वाचून घेतल्या. वाचन संस्कृतीची जडणघडण व स्त्रीलेखनाची जाणीव वाढवण्याच्या उद्देशाने हा उपक्रम यशस्वी झाला. प्राचार्यांनी उपक्रमाचे कौतुक करत सर्व सहभागींचे अभिनंदन केले. याप्रसंगी ग्रंथपाल म्हणाले, या प्रदर्शनाने विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी वाढली असून, भविष्यात असे उपक्रम वारंवार घेतले जातील. हा उपक्रम यशस्वी करणाऱ्या सर्व टीमचे आभार मानले.

संघर्षातून स्फूर्ती: 'आव्हान देतो अंधाराला' कार्यक्रमाने जिंकली मने

दै. अदिती एक्सप्रेस

उदगीर –छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालय उदगीरच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने लुई ब्रेल यांच्या पुण्यतिथी निमित्त आव्हान देतो अंधाराला या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमाचा उद्देश म्हणजे दृष्टीदोष असलेल्या विद्यार्थ्यांनाही समान संधी, सुविधा व आदर मिळावा यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये अंध मुलांबद्दल संवेदनशीलता वाढवणे तसेच अंध विद्यार्थ्यांच्या कलागुणांना, कौशल्यांना आणि नेतृत्वगुणांना व्यासपीठ देऊन त्यांचा आत्मविश्वास बळकट करणे,



दृष्टिदोषाबाबतचे गैरसमज दूर करणे, अंधत्व म्हणजे अपंगत्व नव्हे, तर वेगळ्या क्षमतांची ओळख आहे, हा संदेश समाजापर्यंत पोहोचवणे. प्रेरणादायी आदर्श निर्माण करणे, संघर्षावर मात करून यशस्वी होणाऱ्या अंध विद्यार्थ्यांच्या अनुभवांतून इतर विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे हा होता. या प्रसंगी अरुणा अभय ओस्वाल अंध आणि दृष्टीहीन संसाधन केंद्राचे श्री राजेंद्र चव्हाण व त्यांचे सहकारी यांनी अंध विद्यार्थ्यांनी लुई ब्रेल यांचे जीवन , ब्रेल लिपी बद्दल महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना माहीती दिली. अंध विद्यार्थ्यांनी ब्रेल लिपी वाचन ,लेखन , प्रार्थना , कविता , सुविचार , विणकाम प्रात्यक्षिक व सुमधूर गीत सादर केले.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. रामकिशन मांजरे यांनी डोळस विद्यार्थ्यांनी अंध विद्यार्थ्यांकडून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अतिष आकडे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. विश्वनाथ भालेराव यांनी केले. सदरील कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पत्रकारांनी समाजातील दीन दलित पीडीतांसाठी निर्भीडपणे लिखाण करावे: सतिश मल्लाडे

आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची १९४ वी जयंती साकोळ येथे साजरी

दै. अदिती एक्सप्रेस

शिरूर अनंतपाळ /प्रतिनिधी –पत्रकारांनी समाजातील दीन दलित पीडीतांसाठी निर्भीडपणे लिखाण करावे असे स्पष्ट प्रतिपादन शिरूर अनंतपाळ तालुका मराठी पत्रकार संघाकडून आयोजित करण्यात आलेल्या अद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या १९४ व्या जयंती निमित्त पत्रकार संघाचे अध्यक्ष सतिश मल्लाडे यांनी साकोळ येथे बोलतांना व्यक्त केले.

कार्यक्रमांच्या अध्यक्ष स्थानी भारतीय जनता पार्टीचे शिरूर अनंतपाळ तालुका उपाध्यक्ष संतोष डोंगरे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच अब्दुल अजीज मुल्ला, सामाजिक कार्यकर्त शिवाभाऊ डोंगरे, दाऊद मुल्ला, संतोष माळी आदी उपस्थित होते.

प्रथमतः प्रमुख उपस्थितीत पाहुण्यांच्या व शिरूर अनंतपाळ तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष यांच्या शुभ हस्ते आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पुढे



बोलतांना सतिश मल्लाडे म्हणाले कि, बाळशास्त्री गंगाधर जांभेकर हे मराठीतील आद्य पत्रकार होते. दर्पण हे मराठीतील पहिले वृत्तपत्र त्यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी सुरू केले. ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण वर्तपत्राचा पहिला अंक प्रकाशित झाला तसेच योगायोगाने ६ जानेवारी हा जांभेकरांचा जन्मदिवस असल्यामुळे हा दिवस दरवर्षी महाराष्ट्रात पत्रकार दिन म्हणून साजरा करण्यात येतो. आचार्य बाळशास्त्रींना मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराती, कानडी, तेलगू, फारशी, फ्रेंच, लॅटिन भाषेतील नैपुण्याबद्दल फ्रान्सच्या राजाकडून त्यांचा मानसन्मान करण्यात आला होता. जांभेकरांनी प्राचीन लिप्यांचा अभ्यास करून कोकणातील शिलालेख व ताम्रपट यांचे शोधनिबंध लिहिले मुद्रित स्वरूपातील ज्ञानेश्वरी त्यांनीच प्रथम वाचकांच्या हाती दिली. त्यांच्यात पांडित्य आणि अध्यापनपटूत्व या गुणांचा मिलाप होता. गणित व ज्योतिष यातही ते पारंगत असल्यामुळे त्यांची कुलाबा वेधशाळेच्या शाळेच्या संचालक पदी नियुक्ती झाली होती. शिवाय त्यांना रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, न्यायशास्त्र, इतिहास, मानसशास्त्र या विषयांचे उत्तम ज्ञान होते. त्यांचे अल्पावधीच्या आजारानंतर मुंबईत वयाच्या अवघ्या ३४ व्या वर्षी म्हणजेच १८ मे १८४६ रोजी मुंबईत देहवासन झाले. यावेळी कार्यक्रमात पत्रकार संदीप पाटील, संजीव कांबळे, अजीम मुल्ला, राजकुमार काळे,विरभद्र दोकेर तर रामेश्वर व्हने, बबन कुलकर्णी, महेश रामपुरे, सुरज भुसनुरे, गुरूनाथ मुळजे आदींसह गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्याप्रमाणात उपस्थित होते.

कुस्ती ही महाराष्ट्राची ओळख : माजी मंत्री आ.संजय बनसोडे

माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांच्या हस्ते कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन

दै. अदिती एक्सप्रेस
मनेश पाटील

उदगीर/ प्रतिनिधी – आपल्या ग्रामीण भागातील खेळाडू देशपातळीवर गेले पाहिजे यासाठी मी सदैव प्रयत्नशील आहे. मागील काळात क्रीडा विभागाचा मंत्री म्हणून खेळाडूंसाठी भरीव निधीची तरतूद करून खेळाडू व प्रशिक्षकासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन त्यांना न्याय देण्याचे काम केले आहे. आपल्या ग्रामीण भागात कुस्तीला महत्त्व असून उदगीर शहरात स्व.खाशाबा जाधव यांच्या नावाने राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा घेऊन कुस्ती स्पर्धेला मोठे बळ निर्माण करून देण्याचे भाग्य मला लाभले असून कुस्ती ही महाराष्ट्राची ओळख असल्याचे मत माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

ते उदगीर शहरातील तालुका



क्रीडा संकुल, दसरा मैदान येथे आयोजित आडत व्यापारी वेल्फेअर असोसिएशन , कृषी उत्पन्न बाजार समिती व नगर परिषद उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने श्री गुरु हावगीस्वामी यात्रेनिमित्त भव्य कुस्ती स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून बोलत होते. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजीराव हुडे, माजी सभापती शिवाजीराव मुळे, कल्याण पाटील, वसंत पाटील, भास्कर पाटील, सय्यद जानीमियाँ, चंद्रकांत टेंगटोल, शशिकांत बनसोडे, रवींद्र कोरे, अनिल मुदाळे, शांतवीर मुळे, बाळासाहेब पाटोदे, व्यंकट बोईनवाड, श्रीधर बिरादार, साईनाथ कल्याणी, प्रदीप पाटील, मनोहर बिरादार, नागेश अंबेगावे, आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आ.संजय बनसोडे यांनी, उदगीर येथील व्यापारी बांधवामुळे ही कुस्तीची परंपरा कायम असुन फुटबॉल, कुस्ती, व्हॉलीबॉल, कबड्डी, खो - खो, बास्केटबॉल, क्रिकेट यासारखे खेळ आपल्या भागात मोठ्या प्रमाणात खेळले जातात. या खेळामधुन आपल्या भागातील अनेक खेळाडु राष्ट्रीय पातळीवर आपला नावलौकिक वाढवला आहे. खेळाडुंसाठी हरियाणा येथे ऑलंम्पिक भवन उभारले असुन त्याच धर्तीवर पुण्यामध्ये ८० कोटीचे ऑलंम्पिक भवन उभारत आहे यामुळे व आपल्या महाराष्ट्रातून अनेक खेळाडु निर्माण होवून आपल्या देशाचे नाव करतील असा विश्वास आ.संजय बनसोडे यांनी व्यक्त केला. यावेळी महाराष्ट्राच्या विविध भागातुन कुस्ती पैहलवान व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बिदरमध्ये केडीपी बैठकीत राजकीय संघर्ष; भाजपा व काँग्रेस आमदार आमनेसामने

दै. अदिती एक्सप्रेस
अशोक गुरनाळे

बीदर । प्रतिनिधी- जिल्ह्यातील कर्नाटक डेव्हलपमेंट प्रोग्राम (KDP) अंतर्गत आयोजित बैठकीत सोमवारी (५ जानेवारी २०२६) मोठा राजकीय गोंधळ उडाला. हुमनाबाद मतदारसंघाचे भाजपा आमदार सिद्धू पाटील आणि काँग्रेसचे विधानपरिषद सदस्य (MLC) भीमराव पाटील यांच्यात जोरदार शाब्दिक वाद झाला. हा वाद इतका टोकाला गेला की दोघेही जवळपास एकमेकांवर धावून जाण्याच्या स्थितीत पोहोचले.



जिल्हा पंचायत सभागृहात पार पडलेल्या या बैठकीत भूमी विकास, वनजमिनीवरील अतिक्रमण आणि वस्ती विकास योजनांबाबतच्या प्रशासकीय कारवाईवरून मतभेद उफाळून आले. आमदार सिद्धू पाटील यांनी बैठकीदरम्यान काही भागातील सरकारी व वनविभागाच्या जमिनीवर बेकायदेशीर अतिक्रमण झाल्याचा आरोप करत, प्रशासनावर निष्क्रियतेचा ठपका ठेवला. विशेषतः एका मोठ्या भूखंडाच्या वापरावर त्यांनी थेट प्रश्न उपस्थित केले. त्यावर काँग्रेसचे चडउ भीमराव पाटील यांनी या आरोपांना तीव्र विरोध करत, आमदारांच्या वक्तव्याला राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा आरोप केला. यानंतर दोन्ही नेत्यांमध्ये जोरदार आरोप-प्रत्यारोप सुरू झाले. काही क्षणांतच वातावरण तापले आणि वाद शाब्दिक मर्यादा ओलांडून जवळपास शारीरिक संघर्षाच्या टप्प्यावर पोहोचला. बैठकीला उपस्थित असलेले वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, पोलीस कर्मचारी आणि सुरक्षारक्षकांनी तत्काळ हस्तक्षेप करत दोघांनाही वेगळे केले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी बैठक काही काळासाठी स्थगित करावी लागली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, त्यात दोन्ही नेते आक्रमक भाषेत एकमेकांवर ओरडताना दिसत आहेत. या घटनेनंतर जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापले असून, दोन्ही पक्षांच्या समर्थकांमध्ये चर्चांना उधाण आले आहे. कायदासुव्यवस्था बिघडू नये म्हणून प्रशासनाने सभास्थळी तसेच परिसरात पोलीस बंदोबस्त वाढवला. राजकीय विश्लेषकांच्या मते, विकासकामांच्या बैठकीत घडलेला हा प्रकार लोकप्रतिनिधींच्या वर्तनावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा असून, प्रशासनिक चर्चांना राजकीय संघर्षाचे स्वरूप देण्यात येत असल्याची टीकाही व्यक्त होत आहे.